REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 7 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2018

# गोंदिया जिल्हयातील कौटूंबिक कलहाचे स्वरूप आणि त्याचे व्यक्तिगत व कौटुंबिक दुष्परिणाम:एक अध्ययन

डॉ. कल्पना राऊत
गृहअर्थशास्त्र विभागप्रमुख,
एस. जी. बी. महिला महाविद्यालय, तुमसर.

## साराशं

गोंदिया जिल्हयातील कौटूंबिक कलहाचे स्वरूप आणि त्याचे व्यक्तिगत व कौटुंबिक दुष्परिणाम कसे आहे हे पडताळून पाहण्याच्या दृष्टीकोणातून कौटूंबिक कलह सोडविण्यात कलहाचे स्वरूप आणि त्याचे व्यक्तिगत व कौटूंबिक दुष्परिणाम हा विषय निवडयात आला. महिलांची सर्वसामान्य माहिती, कौटूंबिक आर्थिक माहिती, कौटूंबिक कलहाची माहिती व दुष्परिणाम आणि या कलहांशी संबंधीत विविध घटकांची माहिती अनुसूचि अनुसंधान पद्धती व मुलाख अनुसूचिद्वारे संकलित करून त्याचे विश्लेषण करण्यात आले. संकलित माहितीचे विश्लेषण आणि निर्वचन पुढील सारण्याद्वारे दर्शविण्यात आले आहे.

## प्रस्तावना

जगाच्या पाठीवर कुटुंबसंस्था सर्वदूर आहे. जगाच्या इतिहासात टिकून असलेल्या अति प्राचिन संस्थामध्ये कुटुंबसंस्था आहे. ही संस्था जशी प्राचिन आहे तसेच कुटूंबातील कलह आणि त्यांना सोडविण्यासाठी कालपुरत्वे अस्तित्वात आलेल्या यंत्रणाही जुन्या आहेत. कुटुंबाची गरज जशी अपरिहार्य आहे. तशीच कुटुंबात निर्माण होणा-या कलहांना सामना करणेही क्रमप्राप्तच आहे. कुटुंब व्यक्तिच्या व्यवस्थापन तंत्राची, अर्जित ज्ञानाच्या वापराची, समायोजनाची आणि सहनशिलतेची जणू पावलोपावली परिक्षाच घेत असतो. यात काही अपयशी ठरतात तर काही मध्यम मार्ग निवडून अपयशी होण्यापेक्षा अपयशाचे प्रमाण कमीत कमी करून यशस्वी होण्याचा प्रयत्न करतात.

कुटुंबात एखादी व्यक्ति पुर्णत: काठोकाठ समाधानी किंवा यशस्वी आहे. असे विधान करणे अतिशयोक्तिच होईल. पण कुटुबातील कलह सोडविण्यात वैयक्तिक प्रयत्नांना यश येत नसेल तर उपलब्ध शासकिय, अशासकीय, सामाजिक संस्थाची मदत घेवून रूळावरून घसरत चाललेली किंवा घसरलेली गाडी पुन्हा रूळावर आणणा-या व्यक्तिला निश्चितच शहाणा म्हणावे लागेल. कुटुंबातील कलह सोडविण्यासाठी ज्या कोणत्या यंत्रणा काम करतात. त्या सर्वाचे यशापयश मुळात व्यक्तिच्या समजसपणावरच अवलंबुन आहे कायदा कुटुंबाला अधिकार काडीमोड आर्थिक भरपायी अशा अन्य भौतिक बाबी मिळवून देण्यास सक्षम आहे. पण कोणताही कायदा आईचे वात्सल्य, पित्याचे पितृत्व, कुटुंबाची उब व जिव्हाळा देवू शकत नाही. अशा पार्श्वभुमीवरच महिला तक्रार निवारण केंद्राची भूमिका महत्वाची ठरते.



महिला विकासात कार्यरत असलेल्या संस्था आज मोठया प्रमाणात महिलांवरील कौटूंबिक व सामाजिक अन्याय, अत्याचार तसेच लैंगिक शोषण या विषयांच्या अनुषंगाने विविध उपक्रम राबवित आहेत. महिला लक्षमीकरण कार्यक्रमाबरोबरच महिला व हिंसा, 'कौटूंबिक कलह', कौटुंबिक तणाव, 'कौटुबिक सल्ला व मार्गदर्शन केंद्रे' इत्यादी कार्यक्रमाविषयी आज विविध पातळयावर मोठया प्रमाणात चर्चा होत आहे. यासंदर्भात समाजातील कुटुंबात आढळून येणारे

कौटूंबिक कलह आणि हे कलह सोडविण्यात महिला तक्रार निवारण केंद्राची भूमिका कशी आहे हे अभ्यासणे आज आवश्यक झाले आहे. या अभ्यासावरून महिला आयोगाच्या सहमतीने चालणारे कौटूंबिक सल्ला व मार्गदर्शन केंद्रे, 'महिला तक्रार निवारण केंद्र' कौटूंबिक न्यायालय इत्यादींच्या कार्याचे व यशाचे स्पष्टीकरण व्हावे, या केंद्राचे समाजातील स्थान किती महत्वाचे आहे. हे स्पष्ट व्हावे यासाठी प्रस्तुत अध्ययनाची अत्यंत आवश्यकता आहे.

आपल्या एकूण न्यायव्यवस्थेत दिरंगाई आहे. आज सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांची व उच्च न्यायालयात प्रलंबित असलेला प्रकरणांची संख्या हजारोच्या घरात आहे. भारतीय न्यायव्यवस्थेची संथगती आणि त्यामुळे जनतेला सोसावा, लागणारा त्रास सहजच लक्षात येतो. आजही घटस्फोट पोटगी, मुलांचा ताबाब यासारखे प्रश्न, प्रदिर्घ न्यायालयीन लढाई, कोर्टाची संथ गती, आणि क्लिष्ट न्यायालयीन प्रक्रियेत अडकून न्यायालयीन व्यवस्थेचे बळी पडले आहेत. शहाण्याने कोर्टाची पायरी चढु नये असा समज अजुनही लोकांमध्ये कायम आहे. त्यामुळे पैसा, वेळ, शक्ती, आयुष्य वाचेल असा दुसरा सोपा न्याय प्राप्तीचा पर्याय लोकांना आवश्यक वाटतो, म्हणून महिला तक्रार निवारण केंद्राच्या भूमिकेचा अभ्यास कालसंगत आणि समयोचित वाटतो यासाठीच संशोधनकर्तीने 'गोंदिया जिल्हयातील कौटूंबिक कलहाचे स्वरूप आणि त्याचे व्यक्तिगत व कौटूंबिक दुष्परिणामः एक अध्ययन' हा विषय अध्ययनासाठी निवडलेला आहे.

**सारणी क्रमांक १ कौटूंबिक कलहाचे स्वरूप**

| अ.क्र. | कलहाचे स्वरूप | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | शाब्दीक चकमक | ३०० | १००% |
| २. | अश्लिल शिविगाळ | ५३ | १७.६६% |
| ३. | दैनंदिन व्यवहारात असहकार्य करणे | ५ | १.६६% |
| ४. | अबोला धरणे | ४ | १.३३% |

कलह म्हणजे नकोशी कष्टदायक स्थिती, उपेक्षा, संघर्ष मान–अपमानाची जाणीव इत्यादीमुळे निर्माण झालेली स्थिती, वरील सारणीवरून असे दिसून येते. की कलहाच्या शाब्दीक चकमकी १०० टक्के आढळल्या. टाकुन बोलणे, टोचून बोलणे हयामुळे व्यक्ती दुःखी निराश किंवा आक्रमक होतो. म्हणजेच शाब्दीक चकमक दुःख निर्मितीचे सर्वात प्रमुख कारण ठरते. अश्लिल शिविगाळ (१७.६६ टक्के) करून मनातील राग व उपेक्षेला वाट करून दिली जाते. अतिशय घाणेरडया शब्दात बोलल्यामुळे व्यक्ती प्रतिष्ठेपोटी चुप बसतो. परस्पारांच्या आईवडिलांना नातेवाईकांना अश्लिल शिवीगाळ करून आपण किती हीन लेखतो हे दर्शविले जाते. त्यामुळे व्यक्तिचा अहंकार जोपासला जातो. अपमान केलेल्या भावनेची पुर्तता होते व अप्रत्यक्षपणे बदला घेण्याचा आसुरी आनंद मिळतो.

अबोला धरणे व दैनंदिन व्यवहारात असहकार्य करण्याचे प्रमाण कमी आहे. कारण या प्रकारांमुळे पत्नीला त्रास दिल्याचे समाधान मिळते. परंतु इतरांना अप्रत्यक्ष छळण्याचा आनंद उपभोगता येत नाही. त्यामुळे हया बाबी भांडणा–याला जास्त समाधान देत नाही. राग खदखदत राहतो वरील दोन्ही बाबींमुळे मनातील रागाला वाट करून देता येतो.

सारणी क्रमांक २ कलहाचे व्यक्तिगत दुष्परिणाम

| अ.क्र | कलहाचे दुष्परिणाम | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | घरात कोंडुन ठेवणे | ८ | २.६६% |
| २. | विभक्त राहणे | ८ | २.६६% |
| ३. | घटस्फोटाची धमकी | ६ | २.००% |
| ४. | नैराश्य | ४१ | १३.६६% |
| ५. | कामात मन न लावणे | १०६ | ३५.३३% |
| ६. | वेडसरपणाने वागणे | ०२ | ०.६६% |
| ७. | आत्महत्या कराविशी वाटणे | ३९ | १३.००% |
| ८. | उपेक्षित जिवन जगणे | ३४ | ११.३३% |
| ९. | जिवेमारण्याची धमकी देणे | ३० | १०.००% |
| १०. | घराबाहेर काढणे | ३५ | ११.६६% |
| ११. | पतीकडून दिल्या जाणा-या विविध त्रासामध्ये वाढ | २६ | ८.६६% |
| १२. | मारपीट- हाताने मारणे, बुक्क्यानी मारणे, लाथांनी मारणे, काडीने मारणे, एखाद्या शस्त्राने वार करणे | १९८ | ६६.००% |
| १३. | शारीरीक इजा करणे- ढकलणे, ओरबडणे, चावणे, चटके देणे, रकतबंबाळ करणे कैची किंवा चाकूणे जखमा करणे | २७ | ९.००% |

पत्नी म्हणजे कुटूंबाचा आर्थिक, कार्यीक आधार, कुटुंबाला जोडून ठेवणे, सांभाळणे, आर्थिक आधार देणे ही सर्व तारेवरची कसरत आपआपल्या पद्धतीने गृहीनी करीत असते. परंतु विसंवाद, अपमान, उपेक्षा इत्यादीमुळे कुटूंबात जो कलह होत४ो त्याचे परिणाम गृहीणीवर होवून तिचे मानसिक व शारीरीक आरोग्य ढासळून तिच्या शारीरीक व मानसिक उर्जेचा व क्षमतेचा -हास होतो. यामुळे स्त्रीचे नुकसान होते. वरील सारणीवरून मारपीटीचे प्रामण ६६ टक्के म्हणजे सर्वात जास्त आढळले. आक्रमकतेचा विस्फोट म्हणजे मारामारी, मनात रूजलेला प्रक्षोभ, हाताने, पायाने, बुक्क्याने वि सापडल्यास काठी किंवा शस्त्राने मारहाण करणे ही पण अतिशय निंदणीय बाब, कायद्याची जाणीव करून महिलांच्या नशिबात मारहाण करणे हा नव-याचा अधिकारच आहे असे बरेच पती आजही म्हणतात. ब-याच बायकांच्या तोंडून बायकोचा भार म्हणजेच बाईच्या वाट्याला रोज येणारी मारहाण हा शब्दप्रचारच मारहाणीच्या हिसंकतेचा प्रत्यय देतो.

ओरबडने, चावणे, चटके देणे, कैची किंवा चाकुने जखमा करने, रक्त बंबाळ करणे, ढकलने ह शारीरीक इजेचे प्रकार १ टक्के कुटंबात आढळतात. बरेचदा शारीरीक अशक्त असणा-या व्यक्तकडून या पद्धतीचा वापर केला जातो. कारण या सर्वाद्वारे स्वत:च्या अक्षमतेला, न्युनगंडाला, प्रक्षोभाला वाट करून घावयाची असते. प्रत्येक पुरूषाला स्वत:ची आक्रमकता दर्शविल्याचा अभिमान वाटुन असुरी आनंद उपभोगायाचा असतो. घराबाहेर काढणे, जीवे मारण्याची धमकी देणे, कोंडून ठेवणे इत्यादी सारखे गंभीर परिणाम पीटीत महिलेला वेदनादायक ठरतात. कामात मन न लागणे, नैराश्य, विभक्त राहणे हया अती दु:खदायक व्यक्तिगत अनुभवातुन महिलांचा जीवनाचा प्रवास झालेला आढळून येतो. त्याचप्रमाणे स्त्रीला बरेचदा उपेक्षित जीवन जगावे लागते. कधी विभक्त राहावे लागते तर कधी घरी राहून किंवा माहेरी राहूनही पती घटस्फोटाची धमकी देत राहतो. म्हणजेच महिलेचे एकूण खच्चीकरण करून तिच्या व्यक्तमत्वाला इजा पोहचविणे, तिला अस्तित्वहीन करणे व घाबरवून भितीने आयुष्य जगावयास लावणे हाच उद्देश बहुतांशी आढळतो.

**सारणी क्रमांक ३ कौटूंबिक कलहाचे कौटूंबिक दुष्परिणाम**

| अ.क्र | कौटुंबिक दुष्परिणाम | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | सासर आणि माहेरही दुरावले जाणे | १७ | ५.६७% |
| २. | मनसिक त्रास सहन करावा लागतो. | १४० | ४६.६७% |
| ३. | कुटुंबाची सामाजिक प्रतिष्ठा कमी होते. | ३४ | ११.३३% |
| ४. | कामावर/नौकरीवर अनियमितता व अस्थिरता | ३० | १०.००% |
| ५. | मुलांच्या व्यक्तिमत्वावर विपरीत परिणाम होतो | ७९ | २६.३३% |
| | एकूण | ३०० | १००% |

वरील सारणीवरून असे स्पष्ट होते की, कौटुंबिक कलहामुळे ४६ टक्के पेक्षा जास्त महिलांना मानसिक त्रास सहन करावा लागतो. २६ टक्के पेक्षा जास्त महिलांचे असे मत आहे. की मुलांच्या व्यक्तिमत्वावर या सर्व कलहाचा विपरीत परिणाम होतो. १० ते ११ टक्के महिलांच्या मते यामुळे कुटूंबाची सामाजिक प्रतिष्ठा कमी होते. व कामावर/ नोकरीवर अनियमितता व अस्थिरता असे विपरीत परिणाम जाणवतात.

## निष्कर्ष

कलह म्हणजे नकोशी कष्टदायक स्थिती, उपेक्षा, संघर्ष मान–अपमानाची जाणीव इत्यादीमुळे निर्माण झालेली स्थिती, म्हणजेच महिलेचे एकूण खच्चीकरण करून तिच्या व्यक्तमत्वाला इजा पोहचविणे, तिला अस्तित्वहीन करणे व घाबरवून भितीने आयुष्य जगावयास लावणे हाच उद्देश बहुतांशी आढळतो. तसेच कौटुंबिक कलहामुळे ४६ टक्के पेक्षा जास्त महिलांना मानसिक त्रास सहन करावा लागतो. २६ टक्के पेक्षा जास्त महिलांचे असे मत आहे. की मुलांच्या व्यक्तिमत्वावर या सर्व कलहाचा विपरीत परिणाम होतो. १० ते ११ टक्के महिलांच्या मते यामुळे कुटूंबाची सामाजिक प्रतिष्ठा कमी होते. व कामावर/ नोकरीवर अनियमितता व अस्थिरता असे विपरीत परिणाम जाणवतात.

## संदर्भग्रंथ सूची


- आगलावे, प्रदिप, २००७, 'नमुना निवडीचे तंत्र', सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.
- आगलावे, प्रदिप, २०००, संशोधन पद्धती शास्त्रे व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर.
- आगलावे, प्रदिप, २००३, भारतीय समाज संरचना आणि समस्या, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.
- कुळकर्णी प्रा. पी. के., सामान्य समाजशास्त्र. श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर
- गोऱ्हे डॉ. निलम, कौटुबिक हिंसा विरोधी कायदा, स्त्री आधार केंद्र, पुणे, २००७
- गोऱ्हे डॉ. निलम, अन्यायग्रस्त महिलांची मैत्रीण, स्त्री आधार केंद्र, पुणे, द्वितीय आवृत्ती १९९८